सकाळ महाब्रँड्स

MAHA BRANDS · BRANDS OF MAHARASHTRA · Sakal · 2024



माझे मत

बांधकाम क्षेत्रासारख्या आव्हानात्मक क्षेत्रात ग्राहकांच्या गरजा आणि प्राधान्यक्रमाची पूर्तता दर्जेदार बांधकाम सेवांद्वारे करणे, हेच आमचे धोरण आहे. ग्राहकहिताला आम्ही नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. आमच्याशी एकदा जोडलेला ग्राहक कायमचा जोडला जातो. या क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, नवे ट्रेंड आणि व्यावसायिक नीतिमूल्यांना केंद्रस्थानी ठेवत बांधकाम क्षेत्रातील वाटचालीसाठी 'घाटे उद्योग समूह' कटिबद्ध आहे.

**- ओंकार घाटे**
व्यवस्थापकीय संचालक, घाटे उद्योग समूह



# वॉटर प्रूफिंगसह बांधकाम क्षेत्रात ठसा उमटविणारा **घाटे उद्योग समूह**

GHATE

**प्रतिकूल परिस्थितीतदेखील जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीची तयारी ठेवली तर काय जादू घडू शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे ओंकार घाटे. कोल्हापूर जिल्ह्यातील एक खेडेगावातील ओंकार घाटे यांनी अतिशय हलाखीच्या परिस्थितीवर मात करून व्यावसायिक आणि मानवी मूल्यांची जपणूक करीत 'घाटे उद्योग समूह' उभारला. बांधकाम क्षेत्रातील विविध सेवांसंदर्भात नावारूपाला आलेल्या या आघाडीच्या ब्रँडविषयी...**



पार्क कनेक्ट बाय प्राईड पर्पल



२४ के स्टारगेझ बाय कोलते पाटील डेव्हलपर्स



IV निया बाय कोलते पाटील डेव्हलपर्स

कोल्हापूर जिल्ह्याच्या कागल तालुक्यातील एका खेडेगावात जन्मलेल्या ओंकार घाटे यांना लहानपणापासूनच अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागले. वडील सदाशिव घाटे शेतकरी कुटुंबातील होते. आई आणि वडील शेतात राबून संसाराचा गाडा ओढत होते. ओंकार आणि तीन मुली यांच्या शिक्षणाची तजवीज करणेदेखील सदाशिव घाटे यांना शक्य होत नव्हते. घरातील परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे दोन वेळचा पोटभर आणि सकस आहार मिळणेदेखील दुरापास्त होते. परिस्थिती प्रतिकूल असली, तरी मुलांनी शिक्षण घ्यावे यासाठी सदाशिव घाटे यांची धडपड सुरू होती. ओंकार घाटे यांनी या खडतर पार्श्वभूमीवर संघर्ष करीत गावातच शालेय शिक्षण पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण करीत असताना ते गवंड्याच्या हाताखाली काम करण्यास जात असत.

घरात दारिद्र्य असले, तरी आई-वडिलांनी ओंकारवर प्रामाणिकपणे, मेहनतीने जगण्याचे संस्कार केले. घरात मानवी मूल्यांना महत्त्व दिले जात होते. याचा खोलवर परिणाम ओंकार घाटे यांच्या मनावर झाला. ही मूल्ये करिअरच्या खडतर वाटेवरून चालताना आणि आज व्यवसायाचा वटवृक्ष झालेला असतानासुद्धा ते जपत आहेत.

## शैक्षणिक आणि करिअर संघर्ष

२००३ मध्ये दहावीनंतर ओंकार घाटे यांनी 'एमसीव्हीसी'ला म्हणजे दोन वर्षांचे तंत्रशिक्षण देणाऱ्या कोर्सला प्रवेश घेतला. यात विविध प्रकारचे तांत्रिक शिक्षण दिले जाते. यामुळे नेहमीच्या अकरावी आणि बारावीच्या अभ्यासक्रमाबरोबरच तांत्रिक शिक्षण मिळाल्यामुळे पुढे इंजिनीअरिंग किंवा डिप्लोमा करताना या शिक्षणाचा उपयोग होतो. यात ओंकार घाटे यांनी २००३ मध्ये 'एमसीव्हीसी'अंतर्गत बिल्डिंग मेंटेनन्स या शाखेत प्रवेश घेतला. २००५ मध्ये त्यांनी हा कोर्स पूर्ण केला. हा कोर्स करीत असतानाच आपण सिव्हिल इंजिनीअर व्हायचेच, अशी जिद्द ओंकार घाटे यांच्यात निर्माण झाली.

मात्र पुढील शिक्षण घेण्याऐवढी आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे ओंकार यांनी कागल 'एमआयडीसी'मध्ये वर्षभर नोकरी केली. तांत्रिक शिक्षण घेत असतानाच स्वत:चा व्यवसाय करण्याचा विचार त्यांच्या मनात रुजू लागला होता. त्यामुळे नोकरी सोडल्यानंतर २००६-०७ मध्ये त्यांनी सेंटरिंग कंत्राटदार, बिल्डिंग मेंटेनन्स किंवा दुरुस्ती या प्रकारची कामे करण्यास सुरुवात केली. मात्र त्यात फारशी कमाई होत नव्हती. म्हणून उत्तम संधींच्या शोधात ओंकार २००७ मध्ये पुण्यात आले. पुण्यात त्यांना एका बांधकाम व्यावसायिकाकडे सुपरवायझरची नोकरी मिळाली. मुळातच प्रामाणिक आणि कष्टाळू असलेल्या ओंकार यांनी या संधीचे सोने केले. कंपनीदेखील त्यांच्या कामावर खूष होती. नोकरीत दोन वर्षे झाली होती, तोच २००९ मध्ये जागतिक वित्तीय संकट आले आणि जगभरात मंदीचे वारे वाहू लागले. भारतावरदेखील त्याचा परिणाम झाला होता. या परिस्थितीत नोकरकपातीत ओंकार यांना नोकरी गमवावी लागली.

## दिल्लीत करिअरला वेगळे वळण

काही दिवस तसेच गेल्यावर २००९ मध्येच ओंकार यांना पुण्यातच एका कन्स्ट्रक्शन कंपनीत सुपरवायझरची चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. मात्र कंपनी जरी पुण्यात असली, तरी काम मात्र दिल्लीतील प्रकल्पावर करायचे असल्याने ओंकार यांनी दिल्लीला जावे लागले. परिस्थितीमुळे त्यांना दिल्ली गाठण्याशिवाय पर्याय नव्हता. दिल्लीतील प्रकल्पाच्या ठिकाणी अत्यंत परिश्रम घ्यावे लागत होते. ओंकार चोवीस तास प्रकल्पाच्या स्थळीच असायचे. तेथेच काम करायचे आणि तेथेच राहायचेदेखील. राहणे, खाणे यासंदर्भात अत्यंत हाल होत असतानादेखील ओंकार जिद्दीने काम करीत होते. दिल्लीतील हे वास्तव्य जवळपास तीन वर्षांचे, म्हणजे २०१२ पर्यंत होते. ही नोकरी करीत असतानाच पुढील शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले. त्यातून त्यांनी कलिंगा विद्यापीठात प्रवेशदेखील घेतला. तेथे त्यांनी सिव्हिल इंजिनीअरिंगमध्ये डिप्लोमा पूर्ण केला. पुढे याच विद्यापीठातून त्यांनी २०२२ मध्ये बी.टेक.देखील पूर्ण केले.

दिल्लीत नोकरी करीत असतानाच ओंकार यांनी डिप्लोमा पूर्ण केला आणि त्याच काळात त्यांचे लग्नदेखील झाले. २०१२ मध्ये ते पुण्यात परतले. पुण्यात त्यांनी कन्स्ट्रक्शन कंपनीतच नोकरी करण्यास सुरुवात केली. ही नोकरी करीत असतानाच स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा निर्धार मनात पक्का झाला. दोन वर्षे नोकरी करीत असतानाच ते व्यवसायासाठी प्रयत्नशील होते. यासाठी ते अभ्यास करीत होते, विविध तांत्रिक बाबी लक्षात घेत होते. त्यांच्या असे लक्षात आले, की आगामी काळात बांधकाम क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर होत जाणार आहे. यात विविध सेवांची आवश्यकता भासणार आहे.



इकोपोलिटन बाय अहुरा बिल्डर्स



कुंदन इटर्निया बाय कुंदन स्पेसेस

### 'घाटे उद्योग समूहा'ची वैशिष्ट्ये

- ग्राहकांच्या गरजांनुरूप सेवा
- दर्जेदार सेवेसाठीची कटिबद्धता
- आधुनिक तंत्रज्ञान आणि ट्रेंडचे आकलन
- व्यवसाय करतानाच मानवी मूल्यांची जपणूक
- नियोजित वेळेते सेवेची पूर्तता

## वॉटरप्रूफिंग सर्व्हिसची सुरुवात

यातूनच त्यांनी २०१५ च्या सुमारास कन्स्ट्रक्शन वॉटर प्रूफिंग सर्व्हिसची सुरुवात केली. अगदी छोट्या स्वरूपाच्या कामांपासून व्यवसाय वाढविण्याचा ओंकार यांचा प्रयत्न होता. मात्र हे करीत असताना विविध अडचणींना तोंड द्यावे लागत होते. तरीही न डगमगता जिद्दीने ओंकार यांनी वाटचाल सुरू ठेवली. सूक्ष्म निरीक्षणशक्तीची देणगी असलेल्या ओंकार यांचा या क्षेत्राविषयी बारकाईने अभ्यास सुरू होता. त्यांच्या असे लक्षात आले, की बांधकाम क्षेत्राशी संबंधित विविध कामांना महत्त्व दिले जाते. मात्र वॉटरप्रूफिंगसारख्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीला अद्याप तितके महत्त्व दिले जात नाही. शिवाय, या क्षेत्रात कौशल्यपूर्वक काम करणाऱ्या मनुष्यबळाचीदेखील कमतरता आहे. वॉटरप्रूफिंगच्या क्षेत्रात व्यवस्थित शिक्षण घेतलेले मनुष्यबळ मार्केटमध्ये उपलब्ध नाही आणि दर्जेदार कामासाठी भविष्यात यात उत्तम कौशल्य असणाऱ्यांना उत्तम संधी आहेत, हे ओंकार यांनी अचूक हेरले. शिवाय, नोकरी करीत असताना त्यांना वॉटरप्रूफिंगवर काम करण्याची संधी मिळाल्याने ते यात निपुण झाले होते. मार्केटमध्ये यासंदर्भातील चांगल्या सेवेची आवश्यकता सर्वच बांधकामांसाठी आहे आणि आपण ती सेवा पुरवूया, असे ठरवून नोकरी करीत त्यांनी या प्रकारची कामे छोट्या स्वरूपात करण्यास सुरुवात केली. त्यांचे काम इतके कौशल्यपूर्ण आणि उत्तम दर्जाचे होते, की ग्राहक त्यांच्या कामावर अतिशय समाधानी होते. नियोजित वेळेत उत्तम काम केल्यामुळे त्यांना अधिक संधी मिळू लागल्या. अर्थात, व्यवसायासाठी लागणाऱ्या वित्तीय पाठबळासाठीदेखील ओंकार यांना तारेवरची कसरत करावी लागत होती. मात्र त्यांची हिंमत आणि जिद्द तसूभरदेखील कमी झाली नव्हती. त्यांनी नेटाने प्रयत्न सुरूच ठेवले आणि त्यातूनच त्यांना हळूहळू यश मिळू लागले. यातून त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी पूर्ण ताकदीने स्वत:च्या व्यवसायाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला.

## व्यवसायाची सुरुवात

२०१७ मध्ये नोकरी सोडून ओंकार यांनी 'गायत्री कन्स्ट्रक्शन' नावाने कंपनी सुरू केली. व्यवसाय करीत असताना कामाची सर्वोत्तम गुणवत्ता, ग्राहकांचे प्राधान्य आणि नियोजित वेळेत काम पूर्ण करण्याचे सूत्र ओंकार यांनी नेहमीच जपले. यातून त्यांच्या कंपनीबद्दलची विश्वासार्हता बांधकाम क्षेत्रात वाढतच गेली आणि व्यवसायाचा विस्तार होत गेला. प्रारंभी एका मदतनीसापासून कामाची सुरुवात झाली होती. मात्र हळूहळू मनुष्यबळ वाढत गेले. प्रतिकूल परिस्थितीत व्यवसाय करीत असतानादेखील आपल्यासाठी काम करणाऱ्या मजूर, कर्मचाऱ्यांबद्दल आत्मीयता बाळगत ओंकार त्यांच्या आर्थिक बाबींचीदेखील काळजी घेत होते. या कर्मचाऱ्यांचे, मजुरांचे कुटुंब आपल्यावर अवलंबून आहे आणि त्यांचा उदरनिर्वाह योग्यरीतीने पार पाडण्याची जबाबदारी आपली आहे, ही भावना ओंकार यांच्या मनात होती. लहानपणापासून आई-वडिलांनी मानवी मूल्ये आणि सामाजिक बांधिलकीचे दिलेले धडे ते विसरलेले नव्हते. त्यामुळेच त्यांच्याशी माणसे जोडली जात होती आणि एक चांगली टीम तयार होत होती. कामाच्या गुणवत्तेबाबत ओंकार कायमच आग्रही आहेत. ग्राहकांना उत्तम दर्जेदार गुणवत्तेची सेवा पुरवली, की ते नक्कीच कामाची दखल घेतात आणि इतरांनादेखील आपल्या सेवेबद्दल सुचवतात, हा ओंकार यांचा अनुभव होता. याशिवाय, अभ्यासू वृत्तीच्या जोरावर व्यवसायातील असंख्य बारकावे लक्षात घेत त्यांनी वॉटरप्रूफिंगच्या क्षेत्रावर पकड मिळविली. यातून त्यांचा नावलौकिक वाढू लागला आणि ग्राहकांची संख्यादेखील वाढत गेली.

## 'घाटे समूहा'चा विस्तार

फक्त वॉटरप्रूफिंगपुरतेच मर्यादित न राहता प्रत्यक्ष बांधकाम करण्याच्या व्यवसायातदेखील ओंकार घाटे यांनी विस्तार करण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच २०२० मध्ये ओंकार यांनी 'घाटे कन्स्ट्रक्शन प्रा. लि.'ची सुरुवात केली. ही कंपनी विकसकांच्या आवश्यकतेनुसार प्रकल्पांचे बांधकाम करून देते. 'घाटे उद्योग समूहा'ने असंख्य नामांकित विकसकांच्या प्रकल्पांसाठी वॉटरप्रूफिंग काम पूर्ण केलेले आहे. व्यवसायात जम बसल्यावर ओंकार घाटे यांनी 'घाटे' या ट्रेडमार्कने व्यवसायाचा विस्तार केला. त्यानुसार 'घाटे समूहा'अंतर्गत 'घाटे वॉटरप्रूफिंग सोल्यूशन्स प्रा. लि.', 'घाटे कन्स्ट्रक्शन प्रा. लि.' या दोन कंपन्यांबरोबरच 'ओंकार ट्रेडर्स' ही बांधकाम क्षेत्रातील विविध मटेरियल्स पुरविणारी ट्रेडिंग कंपनी आणि 'प्रीमियम कन्स्ट्रो केमिकल्स' ही बांधकाम क्षेत्राशी निगडित विविध कन्स्ट्रक्शन्स केमिकल्स पुरविणारी ट्रेडिंग कंपनीदेखील कार्यरत आहे. एका मदतनीसापासून काम सुरू केलेल्या ओंकार यांच्या 'घाटे उद्योग समूहा'ची आज ८० अनुभवी आणि कुशल कर्मचाऱ्यांची टीम आहे. सर्व काम विभागवार पद्धतीने अतिशय शिस्तबद्ध रीतीने पूर्ण केले जाते. इतकेच नव्हे, तर 'घाटे समूहा'च्या विविध सेवांसंदर्भात काम करणाऱ्या मजुरांची संख्या ४,००० वर आहे. यातून 'घाटे उद्योग समूहा'चा झालेला विस्तार लक्षात येतो. आजपावेतो 'घाटे उद्योग समूहा'कडून १८० पेक्षा अधिक बांधकाम प्रकल्प पूर्ण करण्यात आलेले आहेत. पुणे, नागपूर, नाशिक, मुंबई या महाराष्ट्रातील शहरांबरोबर गोवा, दिल्ली, तेलंगणासारख्या विविध राज्यांमध्येदेखील 'घाटे समूह' कार्यरत आहे. आगामी काळात ग्राहकांचा प्राधान्यक्रम आणि गुणवत्तेवर अधिक लक्ष केंद्रित करीत उलाढाल पाचपटींनी वाढविण्याची योजना 'घाटे उद्योग समूहा'ने आखली आहे.

## कर्मचारी- एक परिवार

कर्मचारी हा आपला विस्तारित परिवारच आहे, या मूल्यानुसार 'घाटे उद्योग समूहा'मध्ये कर्मचाऱ्यांची काळजी घेतली जाते. एकदा एखादा कर्मचारी आपल्याशी जोडला गेला, की तो कायमचा जोडला जावा, हेच समूहाचे धोरण आहे. ओंकार घाटे यांच्या कुटुंबात असलेल्या मानवी मूल्यांचा अंगीकार 'घाटे उद्योग समूहा'च्या व्यावसायिक वाटचालीतदेखील झाला आहे. कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांचेदेखील आयोजन केले जाते. कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारच्या सुविधा पुरविताना वैयक्तिक समस्यांमध्येदेखील 'घाटे उद्योग समूह' त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहतो. त्यामुळेच आजही व्यवसायाची सुरुवात केल्यापासूनचे कर्मचारी या समूहात कार्यरत आहेत. यातून समूहामध्ये एक आगळीवेगळी सकारात्मक कार्यसंस्कृती निर्माण झाली आहे. समूहाच्या विस्तारात या गोष्टीचेही मोठे योगदान आहे.

## सामाजिक बांधिलकी

लहानपणापासून कुटुंबात असलेला सामाजिक बांधिलकी आणि आध्यात्मिकेचा वारसा ओंकार घाटे यांनी 'घाटे उद्योग समूहा'तदेखील जपला आहे. कोरोना काळात जेव्हा सर्वच व्यवसाय अडचणीत आला होता आणि वित्तीय संकट उभे ठाकले होते, अशा परिस्थितीतदेखील त्यांनी कर्मचाऱ्यांची साथ न सोडता सर्व कर्मचाऱ्यांना घरी बसून पूर्ण पगार दिला. त्याचबरोबर त्यांच्याकडे काम करणाऱ्या सर्व मजुरांना सर्व प्रकारची मदत पोहोचविली. मातीशी नाळ जोडलेले ओंकार घाटे स्वत: तर निर्व्यसनी आहेतच, तसेच ते समाजप्रबोधनाच्या कामासदेखील मदत करतात. कागल तालुक्यातील गावात ते जनजागृतीचे विविध उपक्रम राबवितात. रक्तदान शिबिरांचे आयोजन करतात. त्याचबरोबर लहानपणीच शिक्षणाचे महत्त्व उमगले असल्यामुळे ग्रामीण भागातील गरजू शाळांना आर्थिक मदत करतात.



घाटे उद्योग समूहाच्या टीमसह ओंकार घाटे

### मिळालेले पुरस्कार

- महाराष्ट्र शासनाचा एमएसएमई श्रेणीसाठीचा पुरस्कार
- ॲमेझिंग आंत्रप्रेन्योर पुरस्कार
- आयडॉल ऑफ महाराष्ट्र पुरस्कार
- नॅशनल क्वालिटी अवॉर्ड
- रवीना टंडन यांचेकडून नॅशनल क्वालिटी अवॉर्ड
- करिश्मा कपूर यांचेकडून आयकॉन ऑफ इंडिया

### पूर्णत्वास गेलेले प्रकल्प

- पार्क कनेक्ट बाय प्राईड पर्पल
- २४ के स्टारगेझ बाय कोलते पाटील डेव्हलपर्स
- वेस्टर्न अव्हेन्यू बाय कोलते पाटील डेव्हलपर्स
- IV एनआयए बाय कोलते पाटील डेव्हलपर्स
- इकोपॉलिटन बाय अहुरा बिल्डर्स
- कुंदन एटर्निया बाय कुंदन स्पेसेस
- ली मेरिडियन हॉटेल नागपूर
- डब्ल्यू हॉटेल गोवा
- पार्क साईट नेक्स्ट नाशिक

### पत्नीची खंबीर साथ



ओंकार घाटे यांचे लग्न ते दिल्लीत नोकरी करीत असतानाच झाले होते. त्यामुळे त्यांनी नोकरी करताना आणि नंतरच्या काळात व्यवसाय सुरू करताना घेतलेले कष्ट, केलेला संघर्ष या सर्व गोष्टींच्या साक्षीदार त्यांच्या पत्नी, रोहिणी घाटे आहेत. त्या नेहमीच ओंकार यांच्या पाठीशी भक्कमपणे उभ्या राहिल्या. रोहणी यांनी प्रत्येक अडचणीतून मार्ग काढताना नेहमीच साथ दिली आणि नेहमीच समजून घेतले, हे ओंकार अभिमानाने नमूद करतात. रोहिणी यांनी फक्त कुटुंबाचीच जबाबदारी सांभाळली नाही, तर व्यवसायातदेखील हातभार लावला. आज त्या 'घाटे उद्योग समूहा'च्या संचालक पदावर कार्यरत असून, कंपनीच्या विविध जबाबदाऱ्या सांभाळतात. रोहिणी यांच्यामुळे 'घाटे समूहा'तील महिला कर्मचाऱ्यांना मोठा आधार वाटतो आणि त्यांच्या अडचणी सोडविणे सोपे ठरत असल्याचेही ओंकार यांनी सांगितले.

### 'घाटे उद्योग समूहा'च्या सर्व्हिसेस



- ॲडव्हान्स वॉटरप्रूफिंग सर्व्हिस प्रोव्हाईड करणे
- कन्स्ट्रक्शन वॉटरप्रूफिंग सर्व्हिस प्रोव्हाईड करणे
- इन्फ्रास्ट्रक्टर डेव्हलपमेंट सर्व्हिस प्रोव्हाईड करणे
- नाविन्यपूर्ण बांधकाम सेवा प्रोव्हाईड करणे
- बांधकामाचे इन्स्पेक्शन आणि गुणवत्तेची खातरजमा करणे
- बांधकाम क्षेत्रातील विविध मटेरियल्स पुरविणे
- बांधकाम क्षेत्राशी निगडित विविध केमिकल्स पुरविणे

**घाटे उद्योग समूह**
पत्ता : तिसरा मजला, पार्थ मर्कन्टाईल, सूस-नांदे रोड, सूस गाव, पुणे, महाराष्ट्र ४११ ०२१
फोन : 8308607878
ईमेल : admin@ghategroups.com
वेबसाईट: https://ghategroups.com